# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ऑईल एन्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड (ओएनजीसी), तालुका-उरण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित अतिरिक्त अतिरिक्त सहविद्युत प्रकल्प (जीटी-४) व वाढीव/एनहान्स्ड रिएक्टीव्ह थर्मल ऑक्सिडायझर (ईआरटीओ) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ऑईल एन्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड (ओएनजीसी), तालुका-उरण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित अतिरिक्त सहविद्युत प्रकल्प (जीटी-४) व वाढीव/एनहान्स्ड रिएक्टीव्ह थर्मल ऑक्सिडायझर (ईआरटीओ) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी दिनांक २७ ऑगस्ट, २०१९रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थान, तालुका-उरण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५८/२०१९, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी(डब्लुपीसी)/पीएच/ बी -३१४० दि. २६-०८-२०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

**- अध्यक्ष**

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**-सदस्य**

२) प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

**- समन्वयक**

३) उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
तळोजा

श्री राहूल मोटे, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, तळोजा तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी समितीचे अध्यक्ष, शासकीय अधिकारी व पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीस उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. मप्रनि मंडळाकडे प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ऑईल एन्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड (ओएनजीसी), तालुका-उरण, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित अतिरिक्त सहविद्युत प्रकल्प (जीटी-४) व वाढीव/एनहान्स्ड रिएक्टीव्ह थर्मल ऑक्सिडायझर (ईआरटीओ) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रस्ताव प्राप्त झाला. प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित अतिरिक्त सहविद्युत प्रकल्प (जीटी-४) व वाढीव/एनहान्स्ड रिएक्टीव्ह थर्मल ऑक्सिडायझर (ईआरटीओ) प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ मुल्यमापन समिती (उद्योग) यांनी पर्यावरण आघात अभ्यासाची रुपरेषा मंजूरी (Sanction of Terms of Reference) दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी प्राप्त झालेली असून सदरहू प्रकल्प हा संवर्ग – अ ५ (सी) मध्ये मोडत आहे.

समन्वयक यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे आहे.

त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा, मप्रनि मंडळ, यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बैठकीच्या ३० दिवस आधी स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक

२३ जुलै, २०१९ रोजी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची सूचना प्रसिध्द केली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा सर्व दस्तावेज पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, तसेच कार्यकारी सारांश अहवाल यांच्या मराठी व इंग्रजीमधील अहवालांच्या प्रती भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, झोनल कार्यालय, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय- रायगड, अप्पर जिल्हादंडाधिकारी, रायगड, जिल्हा परिषद- रायगड, तहसील कार्यालय-उरण, जिल्हा- रायगड, जिल्हा उद्दयोग केंद्र, जिल्हा- रायगड, उरण नगरपरिषद, तालुका-उरण, जिल्हा-रायगड, ग्रामपंचायत कार्यालये नागाव, म्हाटवली, चांजे, शेवा, बोकडवीरा, भेंडखळ, पागोटे, डोंगरी, करळ, सावकार, सोनारी, झास्कर, नवघर, हनुमान कोळीवाडा, केगांव (गट ग्रामपंचायत), जिल्हा-रायगड — मुख्यालय-अलिबाग, मुख्यालय-महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, पर्यावरण विभाग-मंत्रालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड, उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तसेच मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर सर्व जनतेसाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करण्यात आले होते.

समन्वयक यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा यांस सदरहू प्रकल्पाबाबत एकही लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या नाहीत. त्यांनी असेही सांगितले की उपस्थित असलेल्या सर्वांना जनसुनावणी दरम्यान त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना करण्याची संधी देण्यात आली असून लेखी व तोंडी स्वरुपात त्या देऊ शकतात. त्यांनी सांगितले की सदरहू सुनावणी ही दोन भागात होईल. प्रथम प्रकल्प प्रवर्तकांचे सल्लागार सादरीकरणाव्दारे प्रस्तावित प्रकल्पाबाबत व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबद्दल माहिती. त्यावर उपस्थितांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविता येतील व प्रकल्प प्रवर्तक त्या आक्षेपांचे समाधान करतील. समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रतिनिधींना सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रतिनिधी यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती सादरीकरणाव्दारे दिली. यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाचे स्थान, प्रकल्पाचा उद्देश, प्रकल्पामुळे होणारी रोजगार निर्मिती, प्रकल्पातील सुरक्षितता व सामाजिक व आर्थिक प्रगती इ. बाबतची माहिती दिली.

यानंतर प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नवी मुंबई तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. लेखी सूचनाही देऊ शकतात याची माहिती सांगितली. तोंडी सूचना सांगताना प्रथम आपले नाव व गावाचे नांव सांगण्यात यावे अशी सूचना केली. त्यांनी सागिंतले की प्रश्नाची पुनरावृत्ती करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे पर्यावरणविषयक प्रश्न मांडण्यात यावे. सदरहू सूचना, आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल व ते इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली येथील उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. ती समिती पर्यावरण अनुमतीबाबत पुढील निर्णय घेईल. त्यांनी उपस्थितांना त्यांचे प्रश्न, सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

**खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला व सूचना, आक्षेपकांना प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे:-**

१) **श्री आनंद घरत, सरपंच, मातवली, तालुका-उरण, जिल्हा-रायगडः-**

मी सरपंच, उप-सरपंच, सदस्य पंचायत समितीतर्फे ह्या बैठकीस उपस्थित आहे. २५ दिवसांपूर्वी ग्रामपंचायत कार्यालयास एक पत्र मिळाले. त्याचबरोबर पत्राबरोबर अहवालही प्राप्त झाला. अहवाल अभ्यास करताना काही मुद्दे उपस्थित होतात. तरी त्याबाबत उपस्थित झालेले मुद्दे लेखी स्वरुपात मी पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीस सादर करत आहे. त्याचा समितीने सहानुभुतीपूर्वक विचार करावा. त्यांनी त्यांचे लेखी निवदेन पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीस सादर केले.

२) **श्री राजेन्द्र आत्माराम ठाकूर, माजी सरपंच, सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत, केगाव, तालुका-उरण, जिल्हा-रायगडः-**

ही बैठक पर्यावरणविषयक आहे. प्रकल्प हा देशासाठी चांगला आहे. आताच सादरीकरण दाखविण्यात आले. अहवालात नागाव, मातवली व करंजा ही गावें दाखविली. मात्र प्रकल्पग्रस्त असूनही अहवालात केगावचे नावच नाही. केगाव गावास दरवेळी डावलण्यात येते. याचे कारण एकच असू शकते की प्रकल्प प्रवर्तकांनी केगावास कोणीही विश्वासात घेतले नाही. प्रकल्पाच्या पाईपलाईन्स ह्या केगावातूनच

गेलेल्या आहेत. प्रकल्पास केगावच्या लोकांनी विरोध केलेला नाही. सहकार्यच केलेले आहे. पण गावाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत. प्रकल्पाचे तेल समुद्रात जाते. ते स्वच्छ करण्यात येत नाही. समुद्रात बंधारा बांधण्याचे व तेल साफ करण्याचे आश्वासन दिले जाते.. मात्र प्रकल्प व्यवस्थापक लक्ष घालत नाही. त्यामुळे येथील मच्छमारी धोक्यात आलेली आहे. जर परिसरात पनवेल, उरणवरुन मोटर सायकलने आल्यास वासाचा त्रास किती आहे हे कळेल. नाकाला रुमाल बांधल्याशिवाय परिसरात चालताच येत नाही. तरी याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने लक्ष घालावे.

प्रकल्प व्यवस्थापक परप्रांती लोकांना नोक-या देतात. मात्र प्रकल्पग्रस्त केगावच्या लोकांना नोक-या देत नाहीत. उपजिविकेचे साधन राहिलेले नाही. ह्या अन्यायाचा एकदिवशी उद्रेक होईल. जनसुनावणीसाठी केगावकरांना आत येऊन देण्यात आले. नाहीतर गेटमधून आत येण्याची परवानगी देण्यात येत नाही. प्रकल्पामुळे मच्छिमारांवर उपासमार करण्याची वेळ आलेली आहे.

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधीतून एकही पैसा केगावास खर्च करण्यात येत नाही. तरी मच्छीमारांचा प्रश्न सोडविण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रकल्पामुळे परिसरात होणारे दुषित पाणी १००% शुध्द करण्यात यावे. ज्या घातक गोष्टी आहेत, त्यावर काम करण्याची गरज आहे. तरी याबाबत लक्ष घालण्यात यावे.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी प्रकल्प प्रवर्तकांना श्री राजेन्द्र ठाकूर यांनी केगावचे नाव अहवालात घेतले नाही हा आक्षेप नोंदविला त्यावर माहिती देण्याची व औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा व घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा व हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती उपस्थितांना सांगण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित असून हवेची गुणवत्ता वेळोवेळी तपासली जाते. प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग व्यवस्था कार्यान्वित असून ती केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला जोडलेली आहेत. सर्व हवा प्रदूषणाची मानके ही घालून दिलेल्या निर्देशांच्या मर्यादेतच आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित असून सांडपाण्यावर प्रक्रिया केले जाते. प्रकल्पाची स्वतःची प्रयोगशाळा असून त्यामध्ये पाण्याचे नमुने तपासले जातात. त्याचप्रमाणे मप्रनि मंडळही पाण्याचे नमुने गोळा करते. औद्योगिक सांडपाण्याची सर्व मानके ही मप्रनि मंडळाने घातलेल्या निर्देशांप्रमाणेच आहेत.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे असे सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात केगाव गावाचे नांव घेतलेले नाही. कारण प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पग्रस्त गावांसाठी तीन संवर्ग केलेले आहेत. पहिला संवर्गात ज्या गावात प्रकल्प वसला आहे ती घेतली. त्यात नागाव, मातवली व कारंजे येते. केगाव हे बाजूला आहे व केगावातून पाईप्सलाईन्स गेलेल्या आहेत. म्हणून केगाव हे ब संवर्गात मोडत आहे. रस्त्यासाठी जी गावे येतात, ती क संवर्गात घेण्यात आलेली आहेत.

तरी जिथे आता हा प्रकल्प येणार आहे, त्याच गावांची नावे नागाव, मातवली व करंजा घेतलेली आहेत. विस्तारिकरण प्रकल्पही केगावात नाही. जाणूनबूजुन केगावचे नाव वगळलेले नाही, कारण तेथे विस्तारित प्रकल्पही उभा राहणार नाही. केगावात प्रकल्प व्यवस्थापकांनी एक-दोन कामे घेतली. मात्र जसा प्रस्ताव येईल व जर तो निष्कर्षात असेल तर जर निधी मंजूर झाल्यास त्याप्रमाणे केगावतही सीएसआर निधी वापरण्यात येईल.

श्री. राजेन्द्र ठाकूर यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पाच्या पाईपलाईन्स ह्या केगावातूनच जातात. त्या जाऊ दिल्या नसत्या तर प्रकल्प उभा राहिला नसता. केगावला डावलेले आहे. प्रकल्प सुरु झाल्यापासून सीएसआर निधी केगावला देणार का याबाबत उत्तर हवे. याबाबत कायमचा तोडगा निघायला हवा. सदरहू उत्तराने केगावकर समाधानी नसून प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर जबाबदारीने दिले पाहिजे. जर पाईपलाईनच गेली नसती, तर प्रकल्प उभा राहिला असता का?

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की श्री राजेन्द्र ठाकूर यांनी पोटतिडकीने उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतान्तात समावेश करण्यात आलेला आहे.

**३) श्री काशीनाथ सखाराम गायकवाड, माजी सरपंच, नागाव,तालुका-उरण, जिल्हा-रायगडः-**

सरपंच श्री राजेन्द्र ठाकूर यांनी मांडलेला प्रश्न सर्व परिसराचा आहे. जर प्रकल्पग्रस्त नाही, तर केगाव हे गाव प्रदूषण प्रभावित गाव म्हणून समजण्यात यावे. या परिसरातील सर्वजण हे हवेच्या प्रदूषणाने त्रस्त आहेत. परिसर आरोग्य, बेरोजगारीने गांजलेला आहे. बैठकीची स्थानिकांना काहीही कल्पना नव्हती. त्यामुळे परिसरातील बरेच प्रकल्पग्रस्त लोक आलेले नाहित. आधी स्थानिकांचे प्रश्न माहिती करुन नंतर प्रकल्प उभा करायचा असतो. तरी ही सुनावणी स्थगित करण्यात यावी व परत जनसुनावणी बोलविण्यात यावी. त्या बैठकीत बेरोजगारी, आरोग्य या सर्व विषयांवर चर्चा व्हावी. समितीस नम्र विनंती आहे सर्व प्रश्नांचा विचार व्हावा.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती सांगितली की ह्या बैठकीत कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही. आपले प्रश्नांची नोंद इतिवृतान्तात नोंद घेण्यात येऊन ते इतिवृत मप्रनि मंडळातर्फे केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

**४)श्री प्रविण गुरव, प्रकल्पग्रस्त, राहणार- नागांव, तालुका-उरण, जिल्हा-रायगडः-**

मी स्थानिक असूनही मला काल रात्री एक वाजता कळले की येथे जनसुनावणी आहे. मी एक पत्रकार आहे. सदरहू बैठकीत प्रकल्पाशी किती लोक संबंधित आहेत, किती लोक रोजंदारीचे आलेले आहेत ते सोडून किती स्थानिक व प्रकल्पग्रस्त आहेत याचा विचार व्हावा. तो आकडा प्रसिध्द करण्यात यावा. आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द नाही. प्रकल्पात काम करणारे कायमस्वरुपी, रोजंदारीवर काम करणारे व सोडून स्थानिक प्रकल्पग्रस्त किती हा आकडा घोषित करण्यात यावा.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या मंडपाच्या बाहेर एक रजिस्टर ठेवण्यात आलेले आहे. त्याची नोंद घेण्यात येते. त्याचप्रमाणे बैठकीच्या सुरवातीसच बैठकीच्या समन्वयक यांनी सांगितले आहे की बैठकीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत बैठकीची जाहिर सूचना प्रसारित करण्यात आलेली होती. सर्व नागरिकांना उपस्थित राहून त्यांच्या आक्षेप, सूचना नोंदविणयाचे आवाहन करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे स्थानिक व प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायत कार्यालयात कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आलेला आहे. बैठकीस येण्यास कोणालाही अटकाव नाही. ही सर्व पारदर्शी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

श्री प्रविण यांनी मत मांडले की सदरहू बैठकीत १०% लोकही स्थानिक नाहित. तरी येथे उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांप्रमाणे ही जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी.

त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रदूषण फक्त पाण्याचे, हवेचे व समुद्राचे नाही, तर रोजगाराचेही प्रदूषण आहे. मी एक पत्रकार आहे व लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी आलेलो आहे. येथे १९७८ पासून हायड्रोजन सल्फाइड वायू सोडला जातो. येथे राहणा-या कोणत्याही माणसास विचारा, रात्री आठनंतर येथे प्रचंड वास येतो. या हायड्रोजन सल्फाइड वायूमुळे नागाव, मातवली येथील दहा लोक कॅन्सरने जर्जर झालेली आहेत.

नागाव, मातवली भागात जो कॅन्सर होतो, तो हायड्रोजन सल्फाइड वायूमुळे आहे. याचा वैदकीय खर्च कोण करणार आहे हा प्रश्न आहे. कारखान्यात प्रशिक्षणासाठी नागपूर, ओरिसा व बाहेरील राज्यांतील लोक येतात, मात्र नागाव, मातवली येथील लोकांना रोजगाराची संधी नाही. काही दिवसांपूर्वी येथे ६५ लोकांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यातील फक्त पाच लोक मांतवली व नागावची होती. आम्ही जमिनी द्यायच्या, मच्छिमारी बंद झाली, उपजिवेकेचे साधन नाही व वारसांना नोक-या नाहीत. त्यांना उपचारासाठी पैसा नाही. त्यासाठी त्यांना नोक-या मिळाल्या पाहिजेत.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की १९७८ साली प्रकल्प सुरु झाल्यावर १६५ प्रकल्पग्रस्त होते, त्या खातेदारांना नोक-या देण्यात आल्या. प्रकल्पामुळे परिसरात त्रास होतो, तर त्या लोकांना काय म्हणायचे? त्यांची वारसदार हे कर्ती असूनही त्यांना नोक-या नाहीत. जर त्यांना हायड्रोजन सल्फाइड वायूमुळे त्रास होतो, तर त्यांच्या उपचारासाठी त्यांच्या वारसदारांना प्रकल्पात नोक-या दिल्या पाहिजे. परिसरातील विहिरींच्या पाण्यावर तेलाचा तवंग येतो. त्यांना काहीही मोबदला दिला जात नाही.

या गावात सीएसआर फंड वापरला जात नाही. तो राज्याबाहेर वापरला जातो. नागाव, मातवली भागातील रस्त्यांना सीएसआर वापरला जात नाही. तो महाराष्ट्राबाहेर वापरला जातो. ज्यांनी प्रकल्पासाठी सर्व दिले, त्यांना काहीही मिळाले नाही. प्रचंड फायद्यात असणारा हा प्रकल्प असून प्रकल्पग्रस्तांना काहीही मिळालेले नाही. गावात रस्ते नाहिती. विहिरांच्या पाण्यावर तेलाचा तवंग येतो. प्रकल्प प्रवर्तकांची या चार गावांना फुकट पिण्याचे पाणी पुरविण्याची जबाबदारी होती. त्या गावांना पिण्याचे पाणी पुरविण्याची योजना नाही. प्रकल्प अधिकारी हे उरणबाहेर राहतात व प्रकल्पाचा त्रास हा स्थानिक लोकांनाच होतो. प्रकल्प फायद्यात होता, स्थानिक रोजंदारीवर लागले, त्यांना १७-१८ वर्षे काम करुन कमी पगार आहे, तर इतरांना खूपच जास्त आहे. येथे निर्णय घेणारे अधिकारी नाहीत. त्यामुळे येथे झालेल्या चर्चेचा काही फायदाच होत नाही. केगावातून पाईपलाईन गेली. त्यांना पाईप गेलेल्या भागातून शेती व नारळाचे झाड लावता येत नाही. त्यांना काहीही लाभ मिळाला नाही. म्हणजे प्रकल्पाच्या पाईपलाईन्स गेल्या त्यांना काहीही नाही. कारण सदरहू पाईपलाईन जाणारा भाग ब संवर्गात आहे. नागावची ५०० एकर व मातवलीची ३०० एकर जमिन घेतली. त्या गावाची स्थिती पाहा. पूर्वी विहिरींचे पाणी पिता यायचे. आता तेलाचा तवंग दिसतो. प्रकल्प प्रवर्तक हे मान्य करत नाहित. ते म्हणतात की आमचे तेल नाही. जनसुनावणी थांबवा. आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द नाही, पण प्रथम प्रकल्पग्रस्तांना न्याय द्या. साधा कामगार घ्यायचा असला तर तो बाहेरुन आणला जातो. तरी ही जनसुनावणी थांबवावी विनंती.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद करण्यात आलेली असून त्याचा इतिवृतांत समावेश करण्यात येईल. प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती परत सांगितले की समिती कोणताही निर्णय घेत नाही. इतिवृत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत मप्रनि मंडळाकडून केंद्र सरकारला पाठविण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

स्थानिक लोकांच्या भावना जाणून **श्री काशीनाथ सखाराम गायकवाड व काही इतर स्थानिक लोक** सुनावणी थांबवा याची मागणी करत होते. यांनापुढील सुनावणी ही जाहिर लावा. परिसरातील लोक हे १९७४ त्रास सहन करत आहेत. १९७८ पासून नाही,त्यासाठी येथे पाचजण हुतात्मा झाले. नाहितर आम्ही प्रकल्पाची एकही वीट लावून देणार नाही. येथे उद्योगाचे एकही वरिष्ठ अधिकारी नाही.

५) **<u>श्री प्रविण गायकवाड,</u>**

स्थानिक लोक या बैठकीस विरोध का करतात याचा विचार व्हावा. तरी सदरहू बैठक ही स्थगित करण्यात येऊन पंधरा दिवसांनी परत बोलविण्यात यावी. या बैठकीची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना व पंचायत समितीला देण्यात आलेली नाही. हा काही शक्तिप्रदर्शनाचा कार्यक्रम नाही. तर स्थानिकांच्या भावनांचा विचार व्हावा. लोकप्रतिनिधींसमोर ही जनसुनावणी होऊ द्यावी अशी विनंती त्यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना केली.

६) **<u>श्री मोहन काटे, सरपंच- नागाव, जिल्हा-रायगड</u>**

यांनी मत मांडले की स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा विचार करुन सदरहू बैठक स्थगित करण्यात यावी अशी विनंती केली. त्यास माझा पाठिंबा आहे.

काही स्थानिक एकत्रितरित्या अध्यक्षा, पर्यावरणविषय जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठक पुढे ढकलण्याची मागणी करत होते.

त्यावेळी त्यास आनंद घरत, सरपंच मातवली यांनीही बैठक स्थगित करण्यास पाठिंबा दर्शविला व ही सुनावणी परत १५ दिवसांनी घ्यायची मागणी करत होते.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की बैठकीच्या सुरवातीस बैठकीचे समन्वयक यांनी सांगितल्याप्रमाणे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार घेत आहोत. त्यानुसार या समितीचे अध्यक्ष हे जिल्हादंडाधिकारी वा

त्यांचे प्रतिनिधी असतात, तर मप्रनि मंडळाचे अधिकारी हे सदस्य व समन्वयक असतात. बैठकीची माहिती ३० दिवस स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत प्रसिध्द करण्यात येते. सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक आपण लेखी सूचना मांडू शकता वा तोंडी स्वरुपात बैठकीत मांडू शकता. त्याचप्रमाणे लोकांच्या अभ्यासासाठी कार्यकारी सारांश अहवाल, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल जिल्हादंडाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायतसमिती कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालये व मप्रनि मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध करुन यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या झोनल कार्यालयात उपलब्ध केलेले होते. याचा उदेद्श होता की सामान्य जनतेस अहवालाचा अभ्यास करता यावा. याचा उद्देश असा आहे जनतेस प्रकल्पाची उत्पादन प्रक्रिया समजावी, त्यामुळे प्रदूषणात काही वाढ होणार आहे का व त्यासाठी प्रकल्प प्रवर्तक अंगिकारणाऱ्या पर्यावरण सनियंत्रण योजना जनतेस कळाव्यात. येथे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्‌द्यांचा इतिवृतान्तात समावेश करण्यात येतो व इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील अतिउच्च पातळीच्या तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येतो. पर्यावरण अनुमतीबाबत निर्णय ती समिती घेत असते. तरी उपस्थितांना परत आवाहन करण्यात येते की त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या मांडाव्यात. त्याची नोंद घेण्यात येईल. सदरहू बैठक स्थगित करण्याचा अधिकार समितीस नाही. ही बैठक आपले मत, सूचना, आक्षेप शासनास कळविण्यासाठी आहे.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीत परत सांगितले की ह्या समितीत कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही. आपल्या मुद्‌द्यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येऊन ते केंद्र शासनास पाठविण्यात येईल. तरी आपले काही मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावे. त्यांनी पुन्हा उपस्थितांना त्यांचे काही मुद्दे असल्यास ते मांडावेत असे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यामुळे प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले प्रकल्प प्रवर्तकांनी केलेल्या सादरीकरणाव्दारे व उपस्थितांनी काही सूचना नोंदविल्या त्याअनुषंगाने काही प्रश्न उपस्थित होतात. –

१) सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे विस्तारिकरणामुळे १०० घनमीटर प्रतिदिन अतिरिक्त सांडपाण्यात वाढ होणार आहे. ती घरगुती सांडपाणी वा औद्योगिक सांडपाण्यात वाढ होणार याबाबत खुलास करावा. कार्यरत सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा व औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा किती क्षमतेची आहे व विस्तारिकरणामुळे ती विकसित करावी लागेल काय?

२) ग्रामस्थांनी बरेच मुद्दे उपस्थित केले. त्यात तेलाचे तवंग विहिरीच्या पाण्यावर आढळतात हा मुद्दा आहे, तरी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्तेची वार्षिक सरासरी काढण्यात यावी,

३) तसेच कार्यरत व विस्तारित प्रकल्पातून सल्फर-डाय-ऑक्साईड, एनओएक्स एसओटू यासारखी प्रदूषके उत्सर्जीत होणार. तर कार्यरत असलेली हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा त्या क्षमतेची आहे काय व विस्तारिकरणानंतर ती विकसित करावी लागणार काय? त्याचप्रमाणे प्रदूषके बाहेर पडतील, तरी मानकांपेक्षा जास्त उत्सर्जित झाल्यास व एचटूएससाठी एअर प्रदूषण डिटेक्टींग बीपींग सेन्सर बसविणार आहेत काय याबाबत खुलासा करावा.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की येथे दोन प्रकल्पाविषयी चर्चा आहे. ईआरटीओ प्लँटमधून जो गँस निर्माण होतो, तो व्हेन्ट केला जातो. त्यात हायड्रोजन सल्फाइड आहे. ईआरटीओमध्ये ऑक्सीडेशन, कुलर व स्क्रबर सयंत्रणा आहे. त्यामुळे हायड्रोजन सल्फाइड अगदी अल्पप्रमाणात राहिल. ईआरटीओमध्ये सल्फर-डाय-ऑक्साईड व हायड्रोजन सल्फाइड डिटेक्टर लावलेले आहेत. त्यापासून तयार होणारे सोडियम सल्फेट संपूर्णपणे घातक नसणारे आहे.

प्रकल्पात कार्यरत असलेला औद्योगिक सांडपाणी सनियंत्रण यंत्रणा ६,००० घनमीटर प्रतिदिन क्षमतेची आहे. ती १०,००० घनमीटर प्रतिदिन क्षमतेची करण्यात येणार आहे. सर्व मानके ही निर्देशांच्या पातळीतच आहेत. तरीही औद्योगिक सांडपाणी सनियंत्रणा जुनी झाल्याने ती सयंत्रणा विकसित करण्यात येणार आहे.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले.

सौ. अश्विनी पाटील, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे प्रकल्प प्रवर्तक ओएनजीसी लिमिटेड यांच्या अतिरिक्त सहविद्युत प्रकल्प (जीटी-४) व वाढीव/एनहान्स्ड रिएक्टीव्ह थर्मल ऑक्सिडायझर (ईआरटीओ) प्रकल्प संदर्भात

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बैठक आयोजित करण्यात आली. प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, मप्रनि मंडळाचे अधिकारी व स्थानिक उपस्थित आहेत. बैठकीत पहिल्या टप्प्यात प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. तर दुस-या टप्प्यात स्थानिकांकडून बरेच मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्यात रोजगार, तेलामुळे होणारे विहिरींच्या पाण्याचे प्रदूषण व हवा प्रदूषण याबाबत वेगळ्या स्वरुपात मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्याची नोंद इतिवृतान्तात घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सीएसआर निधीबाबत ब-याचप्रमाणात नाराजी उपस्थित करण्यात आली. सीएसआर निधीतून गावातील कामे करण्यात यावी. जनसुनावणीत उपस्थित करण्यात आलेले मुद्दे शासनास कळविण्यात येतील. आता कोणाचेही प्रश्न नसल्याचे दिसून येत आहे. तरी ही जनसुनावणी बैठक संपन्न् झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(राहूल मोटे)**
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,

(डॉ.हेरंबप्रसाद गंधे)
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, नवी मुंबई-२ आणि
प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई

**(अश्विनी पाटील)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड
जिल्हा-रायगड